# <u>नियमीत दिवाणी दावा क्र. १८/२०२५ मध्ये निशाणी १० वरील आदेश</u>

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ विरुध्द दि. २२.०६.२०२५ रोजी झालेला दावा विना कैफियत आदेश रद्य करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीचे कथना प्रमाणे कागदपत्रांच्या विलंबामुळे व अनावधानाने सदरचा विलंब झालेला असल्यामुळे प्रतिवादी मुदतीत त्यांची कैफियत दाखल करु शकली नाही. त्यामुळे प्रतिवादीस त्यांची कैफियत पटलावर दाखल करण्यासाठी त्यांचे विरुध्द झालेला आदेश रद्य करण्याची विनंती केली आहे. वादीने सदर अर्जावर त्याचे म्हणणे दाखल केलेले नाही.

०२. प्रतिवादीच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व पटलावरील कागदपत्र यांचे अवलोकन केले.

०३. वादीने सदरचा दावा हा मालकी जाहीर होऊन कायमचा मनाई हुकूम मिळणेकारीता दाखल केला आहे. प्रतिवादीचे कथनाप्रमाणे त्याची कैफियत पटलावर येणे गरजेची आहे. वादीने मालकी जाहीर होऊन कायमचा मनाई हुकूम मिळणेकरीता दावा दाखल केला असल्याने सदर दाव्याशी प्रतिवादीचे हितसंबंध आहे. प्रतिवादीचे कथना प्रमाणे त्यांना कागदपत्रांच्या विलंबामुळे व अनावधानाने प्रतिवादी मुदतीत त्यांची कैफियत दाखल करु शकला नाही. प्रतिवादीने सदर अर्जा सोबत त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामुळे प्रतिवादीने नमुद केलेले कारण हे संयुक्तीक वाटते. तसेच सदर दावा हा गुणतत्वावर निकाली लागण्यासाठी प्रतिवादीची कैफियत पटलावर येणे गरजेचे आहे. परंतु प्रतिवादीने प्रस्तुत प्रकरणाचे कामकाज लांबणीवर

पाडले, त्यामुळे प्रतिवादीला खर्च देणे योग्य होईल. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–:: <u>आदेश</u> ::–**

०१. सदरचा निशाणी १० वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी विरुध्द दि. २२.०६०२९२५ रोजी झालेला विना कैफियत आदेश वादीस खर्च रक्कम रु. ५००/– दिल्यास रद्द करण्यात येतो.

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2025.09.12 17:32:32 +0530

ठिकाण :– रेणापूर.
दिनांक :– ११.०९.२०२५.

(डी.एम. गित्ते)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
रेणापूर